**VIDYA PRATISHTHAN'S**

# INDAPUR ENGLISH MEDIUM SCHOOL (CBSE),

Date :- 25/06/2025

विद्या प्रतिष्ठान मध्ये जागतिक संगीत दिन उत्साहात साजरा

इंदापूर

दिनांक 25 जून 2025 रोजी विद्या प्रतिष्ठान इंदापूर इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये जागतिक संगीत दिवस उत्साहात साजरा करण्यात आला . संगीत दिनाच्या निमित्ताने वैयक्तिक व सामूहिक गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. इयत्ता तिसरी ते पाचवीच्या गटासाठी सामूहिक गीत गायन तर इयत्ता सहावी ते आठवी या दुसऱ्या गटासाठी वैयक्तिक गीत गायन स्पर्धा घेण्यात आली. समूहगीता बरोबरच वैयक्तिक गीत गायन स्पर्धेतही भाग घेत विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे गीते सादर केली. विद्यार्थ्यांनी आपल्या मधुर आवाजाने सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर मा. प्राचार्या डॉ. सौ ज्योती जगताप मॅडम यांच्या संकल्पनेतून AI चा वापर करून निर्माण झालेले व विद्यालयाचे संगीत शिक्षक श्री निखिल कुलकर्णी सर यांनी संगीतबद्ध केलेले स्कूल गीत सादर करण्यात आले. त्यानंतर मा.परीक्षक शारदा नागपुरे मॅडम यांनी देशभक्तीपर गीत सादर केले, त्यामुळे जणू एक प्रकारची संगीताची मैफिलच जमल्याचा आनंद मिळाला. यानंतर मा. प्राचार्या डॉ. जगताप मॅडम यांनी स्पर्धेचा निकाल जाहीर केला. समूहगीत गायनामध्ये कृष्णा हाऊस विजेता तर गोदावरी हाऊस उपविजेता ठरला, तर वैयक्तिक गीत गायनामध्ये इंद्रायणी हाऊसच्या अनघा अतुल कुतवळ हिने तृतीय क्रमांक, कृष्णा हाऊसच्या ज्ञानेश्वरी प्रवीण काळे हीने द्वितीय क्रमांक तर नर्मदा हाऊसच्या सतीश पिंटू पाटील याने प्रथम क्रमांक पटकाविला. मा. प्राचार्यांनी पुढील वर्षी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी संगीत परीक्षेत यश संपादन करावे हा संदेश दिला. प्राचार्यांच्या या प्रेरणादायी विचाराने कार्यक्रमाची सांगता झाली . प्राचार्या डॉ.ज्योती जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली रेखा वाघमारे व निखिल कुलकर्णी यांनी संगीत दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले.

| **मूल्य व जीवन कौशल** | **उद्देश** |
|---|---|
| प्रभावशाली विचार विमर्श. | विद्यार्थ्यांना आपले विचार व्यक्त करण्याची प्रेरणा देणे |
| स्व ओळख | स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी मुलांना देणे |
| इंटरनेटची नातं जोडणं | विद्यार्थ्यांना इंटरनेटचा उपयोग करण्याची प्रेरणा देणे |

**Programme Incharge** **PRINCIPAL**

**रेखा वाघमारे**

**निखिल कुलकर्णी**